आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूरच्या पोलीस विभागासाठी ३० कोटी ५२ लाखांचा निधी मंजूर

चंद्रपूर पोलीस प्रशासनाच्या पायाभूत सुविधांना आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांतून बळकटी

डॉग स्क्वॉड ट्रेनिंग सेंटर, प्रशिक्षण केंद्र, भरती मैदान, बी.डी.डी.एस. प्रशिक्षण केंद्र व पोलीस निवासासाठी आरक्षित जमिनीच्या भूसंपादनाचा मार्ग मोकळा

चंद्रपूर : चंद्रपूरच्या पोलीस यंत्रणेला अधिक सक्षम करण्यासोबतच पोलीस अधिकारी व अंमलदारांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सातत्याने संवेदनशील भूमिका घेणारे आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर पोलीस विभागासाठी आरक्षित जमिनीच्या भूसंपादनासाठी ३० कोटी ५२ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नवीन चंद्रपूर विकास योजनेतील पोलीस विभागासाठी आरक्षित जागेचा उपयोग डॉग स्क्वॉड ट्रेनिंग सेंटर, पोलीस भरतीसाठी शारीरिक मैदान, प्रशिक्षण केंद्र, बी.डी.डी.एस. ट्रेनिंग सेंटर, इनडोअर फायरिंग बट, पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी शासकीय निवासस्थान तसेच विविध योजनांसाठी करण्यात येणार आहे. नवीन चंद्रपूर येथे होणाऱ्या या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांसाठी आवश्यक जमीन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने झालेली ही प्रशासकीय कार्यवाही चंद्रपूरच्या पोलीस प्रशासनाला अधिक सक्षम अधिष्ठान देणारी ठरणार आहे.

नवीन चंद्रपूर विकास योजनेमध्ये मौजा कोसारा येथील आरक्षण क्र. ११० मधील ८.३० हेक्टर तसेच मौजा दाताळा येथील आरक्षण क्र. १३३ मधील १२.२५ हेक्टर जमीन पोलीस विभागाच्या आरक्षणाने बाधित जागा भूसंपादन करण्यात येणार आहे. या जमिनीवर पोलीस विभागासाठी विविध महत्त्वपूर्ण सुविधा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये डॉग स्क्वॉडच्या प्रशिक्षणासाठी स्वतंत्र सुविधा, पोलीस भरती प्रक्रियेसाठी आवश्यक शारीरिक मैदान, प्रशिक्षण केंद्र, बी.डी.डी.एस. प्रशिक्षण केंद्र, इनडोअर फायरिंग बट, अधिकारी व अंमलदारांसाठी शासकीय निवासस्थान तसेच इतर आवश्यक बांधकामे आणि विविध योजनांचा समावेश आहे.

पोलीस दल हे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी चोवीस तास कार्यरत असते. त्यामुळे त्यांच्या प्रशिक्षणापासून निवासापर्यंत आणि अत्याधुनिक कौशल्यविकासापासून आवश्यक कार्यसुविधांपर्यंत प्रत्येक बाबतीत सक्षम पायाभूत सुविधा असणे गरजेचे आहे. ही गरज लक्षात घेऊन आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पोलीस विभागाच्या सुविधांकडे नेहमीच संवेदनशीलतेने पाहिले आहे. पोलीस स्टेशन इमारती, पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था आणि त्यांच्या घरकुलाचा प्रश्न यानंतर आता प्रशिक्षण आणि इतर अत्यावश्यक सुविधांसाठी जमीन उपलब्ध करून देण्याच्या दिशेने त्यांनी पुढाकार घेतला आहे.

पोलीस अधिकारी व अंमलदारांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी आ. मुनगंटीवार यांनी सातत्याने शासनस्तरावर भूमिका मांडली आहे. पोलीस दलाच्या कार्यक्षमतेसोबतच त्यांच्या कल्याणाचा विचार करणारी त्यांची भूमिका यापूर्वीही विविध निर्णयांतून दिसून आली आहे. पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे, नवीन पोलीस स्टेशनच्या इमारतींसाठी पुढाकार घेणे तसेच प्रलंबित डीजी लोन योजनेच्या प्रश्नावर विधानसभेत आवाज उठविणे, या माध्यमातून आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पोलीस दलाच्या मूलभूत गरजांना प्राधान्य दिले आहे.

नवीन चंद्रपूर विकास योजनेतील मौजा कोसारा येथील आरक्षण क्र. ११० मधील ८.३० हेक्टर आर आणि मौजा दाताळा येथील आरक्षण क्र. १३३ मधील १२.२५ हेक्टर आर पोलीस विभागाच्या आरक्षणाने बाधित जमीन भूसंपादन करण्यासाठी यापूर्वीच ४३ कोटी ६५ लाख ८३ हजार १६ रुपयांची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यापैकी आता ३० कोटी ५२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे या विविध सुविधा उभारण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

संबंधित शासन निर्णयानुसार या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. चंद्रपूरच्या पोलीस प्रशासनाला केवळ आधुनिक कार्यालयीन सुविधा नव्हे, तर प्रशिक्षण, तंत्रज्ञान, निवास आणि कार्यक्षमतेला पूरक सर्वसमावेशक पायाभूत सुविधा मिळाव्यात, या व्यापक दृष्टिकोनातून आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने ही महत्त्वपूर्ण कार्यवाही होत आहे. त्यामुळे भविष्यात चंद्रपूरच्या पोलीस यंत्रणेच्या क्षमतावृद्धीसोबतच अधिकारी व अंमलदारांच्या सुविधांमध्येही मोठी भर पडणार आहे.

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/२७/वार्षिक योजना २०२६-२७/भूसंपादन निधी/२८/२०२६ मुंबई, दिनांक:- ०७/०९/२०२६

## -: आ दे श :-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये (४०७००१४२) (कार्यक्रम), "५३-मोठी बांधकामे" या लेखाशिर्षांतर्गत रु. ५० कोटी इतका अर्थसंकल्पित निधीपैकी महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन ज्ञापन क्र. जमीन-०७२५/प्र.क्र.५२२/पोल-७, दि.२९/०५/२०२६ अन्वये पोलीस आयुक्त, मिरा - भाईदर - वसई - विरार कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी मौजे मिरे, ता. जि. ठाणे येथील सर्व्हे नं. १५ ३३/४, ३३/६, ३३/१०, ५१/३, ५१/५ व ५२/१ येथील एकुण ४५९४ चौ.मी. या खाजगी जागेचे भूसंपादनाचा निवाडा घोषित करण्याकरिता रक्कम रु.१९,४७,६४,५२८/- ( अक्षरी रुपये एकोणीस कोटी सत्तेचाळीस लाख चौसष्ट हजार पाचशे अठ्ठावीस फक्त ) इतका निधी वितरीत करण्यास वित्त विभागाने सहमती दिली होती. त्यानुसार सदर रु.१९,४७,६४,५२८/- इतका निधी पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर-वसई विरार यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

२. आता महाराष्ट शासन गृह विभाग, शासन ज्ञापन क्र. अर्थसं-०६२६/प्र.क्र.३८७/पोल-७, दि.०२/०९/२०२६ अन्वये गृह विभाग "मागणी क्र.बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ००, ८००, इतर खर्च, (००) (००) (०७) पोलीसांकरिता भूसंपादन आणि इमारतीचे बांधकाम यावरील खर्च **(४०७००१४२) (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे**" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरिता उर्वरित १०० टक्के रु.३०,५२,३५,४७२/- इतका निधी वितरणास सहमती दिली आहे. त्यानुसार २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर खर्चासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्रदान करुन वितरण व खर्च करण्यास याद्वारे मंजुरी दिली असून सदर रु. ३०,५२,३५,४७२/- इतका निधी अर्थसंकल्पीय वितरीत प्रणाली (BDS) वर उपलब्ध आहे.

३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७/०४/२०१५ चे परिशिष्ट वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उप विभाग-पाच नियम क्रमांक १ मधील १३४ नुसार या कार्यालयाचे क्र.DGP/३६/O & M(८३००)/Specimen Sign/२००/२०१२, दि.११/०६/२०२६ चे आदेशा अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विभाग प्रमुख म्हणून असलेले वित्तीय शक्तीचे अधिकार व त्यास मंजुरीचे प्राधिकार, विशेष पोलीस महानिरीक्षक (नि.व स.) यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्या प्राधिकाराचा वापर करुन पोलीस विभागाच्या भूसंपादन आणि ईमारतीच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पीय वितरीत प्रणाली (BDS) वर उपलब्ध असलेला तसेच निधी उपलब्धतेनुसार खर्चाचे प्राधान्यक्रम निश्चित करुन रक्कम **रु. ३०,५२,३५,४७२/- (अक्षरी रुपये तीस कोटी, बावन्न लाख,पस्तीस हजार, चारशे बाहत्तर फक्त)** इतका निधी खालील नमूद पोलीस विभागाचे भूसंपादनाकरिता घटक प्रमुख यांना वितरण व खर्च करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | निधी मागणी रक्कम | पोलीस घटक | वितरण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ०१ | मंजूर विकास योजना-नवीन चंद्रपूर आरक्षण क्र.११० मधील क्षेत्रफळ ८.३० हे.आर. व आरक्षण क्र.१३३ मधील क्षेत्रफळ १२.२५ हे.आर जागेचे भूसंपादन करण्याकरीता निधी मिळणेबाबत. | ३०,५२,३५,४७२ | पोलीस अधीक्षक, चंद्रपूर | उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी चंद्रपूर |
| | **एकुण रक्कम रुपये -** | ३०,५२,३५,४७२ | | |

४. यासाठी होणारा रक्कम **रु. ३०,५२,३५,४७२/- (अक्षरी रुपये तीस कोटी बावन्न लाख पस्तीस हजार चारशे बाहत्तर फक्त)** इतका खर्च "मागणी क्र.बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ००, ८००, इतर खर्च, (००) (००) (०७) पोलीसांकरिता भूसंपादन आणि इमारतीचे बांधकाम यावरील खर्च **(४०७००१४२) (कार्यक्रम), ५३-मोठी बांधकामे"** या लेखाशिर्षाखाली खर्ची घालुन **सन २०२६-२७** या वित्तीय वर्षांकरिता मंजुर करण्यात आलेल्या अनुदानातुन भागविण्यात यावा.

५. प्रमाणित करण्यात येते कि, गृह विभाग, शासन ज्ञापन क्र.अर्थसं-०६२६/प्र.क्र.३८७/पोल-७, दि.०२/०९/२०२६ मधील अटींचे पालन करण्यात येईल.

**( रामनाथ पोकळे )**
विशेष पोलीस महानिरीक्षक ( नि. व स.)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

**प्रति,**

अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा, मुंबई.
वरिष्ठ कार्यालय अधिक्षक, का.क्र.३२.

२/- यांनी सदर अनुदान (निधी) उपरोक्त वितरण अधिकारी यांना अदा करावे.

**प्रत सादर,**

अपर मुख्य सचिव, गृह विभाग, पोल-७, मंत्रालय, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- कार्यालय अधिक्षक, का.क्र.३३.

२/- कार्यासन अधिकारी यांनी सदर अनुदान का.क्र.३२ यांना बी.डी.एस.वर उपलब्ध करुन दयावे. तसेच मंजुरी आदेश बिल पोर्टलवर अपलोड करण्यात यावेत.

**प्रत,**

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

२/- यांनी संबंधित वितरण अधिकारी यांचे बँक डिटेल्स, १) Bank Name, २) Account Number ३) IFSC Code /पॅनकार्ड, रद्द मूळ धनादेश (डीडीओ बँक डिटेल्स व्यतरिक्त अन्य उपलब्ध बँक खात्याची माहिती) याबाबतची माहिती तात्काळ सादर करावी.